NAAC Re-Accredited "A" Grade
( 4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संचालित,
के.श्रीराम रामेश्वर पोद्दार व कै. शालिग्राम जी भारतीया संस्थापित

**महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे**

मालेगांव रोड, निसर्गोपचार केंद्रासमोर, धुळे (महाराष्ट्र) (02652-240641)




## भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित

# राष्ट्रीय निबंध लेखन स्पर्धा -2025

**प्रति,**
**माननीय प्राचार्य/संचालक,**

______________________________

______________________________

सस्नेह नमस्कार,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संचलित,महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे महात्मा गांधींजींचे विचार प्रचार-प्रसारासाठी प्रतिबद्ध आहे. या केंद्रमार्फत प्रामुख्याने महात्मा गांधींजींचे तत्त्वज्ञान व त्यांच्या समग्र जीवन कार्याचा  अभ्यास व्हावा,विद्यार्थ्यांमध्ये महात्मा गांधी विचारांद्वारे नैतिक मूल्यांची स्थापना होऊन सुजाण नागरिकांची निर्मिती व्हावी याकरिता सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

भारतीय संविधान हे जगभरात भारतीयांना सन्मान, आदर आणि प्रतिष्ठा देणारे एक महत्त्वाचे दस्तऐवज आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्माण करून  देशाच्या सर्वांगीण विकासात विशेष आणि महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे .आपल्या सर्वांना विदीत आहे की ,2025 हे वर्ष देशभरात भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टिकोनातून 2025 हे वर्ष विशेष महत्त्वाचे आहे.कारण की, जगाला स्वातंत्र्य, न्याय, समता आणि बंधुत्वाचा मंत्र देणारे भारतीय संविधान आपल्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. हा उत्सव साजरा करण्याचा मुख्य उद्देश लोकशाही, समता, विविधतेत एकता, धर्मनिरपेक्षता, जातीभेद निर्मूलन, भारताचे प्राचीन आदर्श आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या तत्त्वांचे स्मरण करणे आहे. 26 नोव्हेंबर हा दिवस भारतात '**संविधान दिन**' म्हणून साजरा केला जातो. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, संपूर्ण भारतात विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संचलित, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे (महाराष्ट्र) यांच्यावतीने देशातील कनिष्ठ /वरिष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठ स्तरीय संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी "**राष्ट्रीय निबंध लेखन स्पर्धा**" आयोजित करीत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे ही विनंती.

## -: निबंध स्पर्धेचे विषय :-

1 भारतीय संविधान : लोकशाहीचा पाया
2 भारतीय संविधान : नागरिकांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या
3 भारतीय संविधान: विविधतेत एकतेचे प्रतीक
4 भारतीय संविधान : न्याय, समता आणि बंधुत्वाचे प्रतीक
5 भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर
6 भारतीय संविधान : एक अद्वितीय दस्तऐवज
7 संविधानाची प्रस्तावना : भारताच्या आदर्शांचे प्रतिबिंब
8 संविधान आणि मूलभूत हक्क - एक आव्हान
9 मानवाधिकार आणि संविधान
10 एक भारत,श्रेष्ठ भारत आणि घटनात्मक संकल्पना
11 भारतीय संविधान आणि स्थानिक स्वराज्य संस्था
12 भारतीय संविधान आणि आरक्षण तत्त्व
13 भारतीय संविधान आणि समाजवाद
14 भारतीय संविधानाची उपलब्धी
15 भारतीय संविधानाची 75 वर्षे
16 भारतीय संविधान आणि निवडणूक प्रक्रिया
17 संविधान : काल, आज आणि उद्या भविष्य
18 संविधान - खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात

## -: निबंध लेखन स्पर्धेचे नियम व अटी :-

१. स्पर्धेचे माध्यम **मराठी, हिंदी आणि इंग्रजी** असेल.
२. देशातील कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालये, विद्यापीठ स्तरीय संस्था आणि शैक्षणिक विभागांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. एका महाविद्यालय/संस्थेतील पंधरा (15) विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होता येईल.
३. स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकाचे वय 25 वर्षांपेक्षा कमी असावे.
४. निबंध लेखनासाठी शब्दमर्यादा 1500 शब्दांची असेल.
५. स्पर्धेत **नि:शुल्क** प्रवेश आहे.
६. स्पर्धेसाठी सादर केलेल्या निबंधांचा पोस्टल आणि इतर खर्च संबंधित महाविद्यालय/संस्था यांनी स्वतः करावा.
७. वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर स्व-हस्ताक्षरात लिहिलेला किंवा टंकित (टाईप) केलेला निबंध पानाच्या एका बाजूला समास सोडून अचूक आणि सुवाच्य अक्षरात लिहिलेला असावा.
स्पर्धकाने मुखपृष्ठावर/पहिल्या पानावर नाव, वर्ग, रोल नंबर, मोबाईल नंबर, ईमेल पत्ता, महाविद्यालयाचे नाव आणि निबंधाचे शीर्षक लिहावे .
८. निबंध सादर करतांना, महाविद्यालय/संस्थेचे शीर्ष पत्रावर (लेटरहेड) संबंधित स्पर्धकांचे नाव वर्ग व अन्य माहिती द्यावी.
९. स्पर्धेतील निबंध प्रकाशित करण्याचे संपूर्ण अधिकार आयोजकांना असतील.
१०. या स्पर्धेसाठी परीक्षक मंडळाचा निर्णय अंतिम असेल.
११. स्पर्धेचा निकाल, बक्षीस वितरणाची तारीख आणि वेळ याची माहिती महाविद्यालये/संस्थांना ईमेल व वर्तमानपत्रात बातमीद्वारे दिली जाईल.
१२. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रे दिली जातील.
१३. स्पर्धकांनी त्यांचे निबंध दि.25.01.2026 पर्यंत पोस्टाने/कुरिअरने किंवा प्रत्यक्ष भेटून खालील पत्त्यावर पाठवावेत : **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, मालेगाव रोड, डी-मार्ट च्या शेजारी, निसर्गोपचार केंद्रासमोर, धुळे- 425001(महाराष्ट्र)**

## पारितोषिक

**प्रथम पारितोषिक ₹2100/- आणि प्रमाणपत्र**
**द्वितीय पारितोषिक ₹1100/- आणि प्रमाणपत्र**
**तृतीय पारितोषिक ₹750/- आणि प्रमाणपत्र**
**उत्तेजनार्थ पारितोषिक ₹251/- आणि प्रमाणपत्र**

**-: स्पर्धेबद्दल अधिक माहितीसाठी:-**

**प्रो.(डॉ.) संजय ढोडरे : मोबाईल नं.** 9822533642, pradnyadhodare3013@gmail.com
**डॉ.विजय लोहार : मोबाईल नं.** 9158082128, vijayloharhindi@gmail.com

आपणास विनंती की ,राष्ट्रीय स्तरावरील ही निबंध स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आपल्या महाविद्यालय/संस्थेतील 15 **स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.**

**विनीत**

| डॉ.विजय लोहार | प्रो. (डॉ.) संजय ढोडरे | प्राचार्य डॉ. पी. एच. पवार | डॉ.विनोद पाटील |
|---|---|---|---|
| सदस्य | कार्यकारी संचालक | कार्याध्यक्ष | कुलसचिव |

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव संचलित, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे**

**कबचौ उमवि ,जळगांव**